


















गौरीशंकर सेवा समिती मलकापूर
व्दारा संचालित

# विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

# झेप
## २०२०

### कोरोना विषाणूपासून वाचण्यासाठी...

* साबणाने आपले हात २० सेकंदपर्यंत वारंवार धुवा.
* गरम (कोमट) पाणी प्या.
* सॅनेटाइजर चा उपयोग करा.
* सोशल डिस्टसिंगचा वापर करा.
* गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळा.
* मास्कचा वापर करा.



## दि. प्रेस रजिस्ट्रेशन ॲक्ट नियम ८ फॉर्म नं. ४ प्रमाणे आवश्यक माहिती


| | | |
|---|---|---|
| प्रकाशन स्थळ | : | विज्ञान महाविद्यालय, मलकापूर |
| प्रकाशन काल | : | वार्षिक |
| मुद्रकाचे नांव | : | योगेश्वर प्रिंटर्स, मलकापूर मो. ९८८१६२०३४८ |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | जनता कॉलेज समोर, मलकापूर, जि. बुलडाणा |
| प्रकाशकाचे नांव | : | डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य) |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा |
| संपादकाचे नांव | : | प्रा. डॉ. आर.टी. परिहार |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा |
| मालकी | : | विज्ञान महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा |

मी डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, मलकापूर जि. बुलडाणा) जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**डॉ. बी. बी. वानखडे (प्राचार्य)**

प्रकाशक


ह्या अंकातील मतांशी संपादक सहमत असतील असे नाही. तसेच वाङमयचौर्यास संपादक जबाबदार नाहीत.



# झेप वार्षिकांक 2021-2022

# झेप वार्षिकांक 2021-22

गौरीशंकर सेवा समिती व्दारा संचालित

# विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

## संपादक मंडळ

**शिक्षक प्रतिनिधी** - प्रा. डॉ. आर. टी. परिहार
प्रा. सौ. जे. एस. कुळकर्णी

**विद्यार्थी प्रतिनिधी** - **मराठी विभाग :**
१) कु. वृदांवणी प्रविण पाटील
२) कु. सुजाता भागवत अढाव
३) कु. पायल अनिल बऱ्हाटे

**हिंदी विभाग :**
१) कु. आकांक्षा विजयकुमार पाचपोळ
२) कु. सुश्मिता संजय इंगळे

**इंग्रजी विभाग :**
१) कु. मोहिनी गोपाळ गारमोडे
२) कु. धनश्री अनिल गवात्रे
३) कु. नेहा दिलीप गवात्रे



## तासिका तत्वावरील प्राध्यापक

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव | विषय |
|---|---|---|
| १ | डॉ. वाय.एन. सरदार | इंग्रजी |
| २ | ए. एस. काळे | मराठी |
| ३ | एस. ई. वरखेडे | संगणकशास्त्र |
| ४ | कु. एस.एस. सावंत | संगणकशास्त्र |
| ५ | कु. कोमल शर्मा | संगणकशास्त्र |
| ६ | श्री. व्ही. बी. सुरडकर | रसायनशास्त्र |
| ७ | कु. आर. जे. गांधी | रसायनशास्त्र |
| ८ | कु. एम.एस. तलरेजा | रसायनशास्त्र |
| ९ | कु. शाझीया अंजूम | रसायनशास्त्र |
| १० | श्री. डी.डी. कासार | रसायनशास्त्र |
| ११ | श्री. आर. पी. चोपडे | रसायनशास्त्र |
| १२ | कु. डी.एम. बोरसे | प्राणीशास्त्र |
| १३ | कु. एच. सी. मालपाणी | प्राणीशास्त्र |
| १४ | कु. पी.ए. जाधव | प्राणीशास्त्र |
| १५ | कु. एन. एस. जटाळे | प्राणीशास्त्र |
| १६ | श्री.एस. पी. शंखपाळ | वनस्पतीशास्त्र |
| १७ | एम.डी. नारखेडे | वनस्पतीशास्त्र |
| १८ | एन.एस. सोनोने | वनस्पतीशास्त्र |
| १९ | श्री.डी.ए. झोपे | पदार्थ विज्ञान |
| २० | कु. वाय.डी. धुमाळे | पदार्थ विज्ञान |
| २१ | कु. पी.डब्ल्यू चोपडे | पदार्थ विज्ञान |
| २२ | कु. ए. आर. डोसे | गणित |
| २३ | कु. पी.एस. नारखेडे | गणित |

## महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव | विषय | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | डॉ. बी. बी. वानखडे | रसायनशास्त्र | प्राचार्य |
| २ | श्री. एस. व्ही. बोरले | वनस्पतीशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | सौ. व्ही. एन. सावजी | रसायनशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ४ | श्री. ए. जे. राठी | प्राणीशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ५ | डॉ. वाय. डी. पाटील | गणित | सहाय्यक प्राध्यापक |
| ६ | डॉ. सी. एम. भारंबे | प्राणीशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ७ | श्री. व्ही. एस. देवळे | शा. शिक्षण | शारिरीक शिक्षण |
| ८ | श्री. डि. वाय. ढाले | भौतिकशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ९ | डॉ. जी. एच. कुऱ्हाडे | रसायनशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| १० | डॉ. आर. टी. परिहार | रसायनशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| ११ | डॉ. वाय. पी. पाटील | वनस्पतीशास्त्र | सहयोगी प्राध्यापक |
| १२ | कु. जे. एस. कुळकर्णी | ग्रंथालय | ग्रंथपाल |
| १३ | प्रा. डॉ. जे. टी. इंगळे | भौतिकशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| १४ | श्री. ए. एफ. गोतरकर | गणित | सहाय्यक प्राध्यापक |
| १५ | प्रा. सौ.पी.एम. इंगळे | संगणकशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| १६ | प्रा.आर.एस. निकम | भौतिकशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |
| १७ | प्रा.आर.एन. पाटील | भौतिकशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक |

## महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. एस.जी. नारखेडे | मुख्य लिपीक |
| २ | श्री. एम. के. सदावर्ते | वरिष्ठ लिपीक |
| ३ | श्री. एम. डब्ल्यू. कोलते | कनिष्ठ लिपीक |
| ४ | श्री. जी. एम. चव्हाण | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ५ | श्री. पी. जी. कोलते | प्रयोगशाळा परिचर |
| ६ | श्री. व्ही. व्ही. पाचपोर | शिपाई |
| ७ | श्री. आर. एम. दांडगे | शिपाई |
| ८ | श्री. ए. व्ही. पाटील | शिपाई |
| ९ | सौ. एस. व्ही. भारंबे | ग्रंथालय परिचर |
| १० | श्री. बी.ए. सावळे | प्रयोगशाळा परिचर |
| ११ | श्री. व्ही. एस. तायडे | प्रयोगशाळा परिचर |
| १२ | श्री. यु. व्ही. शिंदे | प्रयोगशाळा परिचर |
| १३ | श्री. आर. एस. डाबेराव | प्रयोगशाळा परिचर |



# *Vision, Mission & Goals of College*

**Vision :**

A scientific and educational community that is open and welcoming, creative and adaptive and renowned for excellence in knowledge and skills.

**Mission Statement :**

We are committed to quality education, empowering personalities and development of responsible members of the society.

**Goals :**

* To Impart quality based higher education in science for rural based society.
* To develop scientific approach, humanism, spirit of enquiry and reform in the youth of society.
* Utilization of acquired knowledge in problem solving of the society.
* Development of various basic skills among the students so as to become independent members of the society.
* To provide platform for the development of physical, mental and moral strength sport, exntension and co-curricular activities.
* To attain community and social development through the optimum use of infrastructure facilities of the institution.
* To streamline the exuberance of youth for the sake of nation building.

# संपादकीय....

प्रिय विद्यार्थी,

सत्र २०२१-२०२२ चा झेप अंक प्रकाशित करत असतांना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

महाविद्यालयीन कार्यकाल हा विद्यार्थी जिवनातील सुवर्णकाल आहे. अध्ययनाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले सुप्त गुण, विचार, आकलनशक्ती निर्माण व्हावी, त्यांच्या विचारांना वाट मिळावी याकरिता केलेला हा छोटासा प्रयत्न होय. विद्यार्थ्यांमध्ये अनेक कवी, साहित्यिक, विचारवंत उदयास येवू शकतात. विविध क्षेत्रामध्ये विद्यार्थी पारंगत व्हावे. स्वत:विषयी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा त्यांना विविध विषयावर लिखाण करण्याची संधी प्राप्त व्हावी म्हणून हा वार्षिकांक आम्ही प्रकाशित केला आहे.

या अंकात विद्यार्थ्यांनी विविध विषयावर कविता, लेख या माध्यमातून त्यांनी आपल्या सुप्त गुणांना वाव दिला. मराठी, हिंदी, इंग्रजी या तिन्ही भाषांमधून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती साकार झाल्या. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मानसिकतेत विधायक बदल घडवून सामाजिक जाणिव निर्माण व्हावी त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणेच व्यक्तीमत्व विकास घडवून आणावा.

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य बी.बी. वानखडे सर यांनी अंक तयार करण्यासाठी खूप मोलाचे मार्गदर्शन केले. संपादक मंडळाच्या वतीने आम्ही त्यांचे मनापासून आभार मानतो. सर्व प्राध्यापक मित्र आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुध्दा मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे.

योगेश्वर प्रिंटर्स, मलकापूर यांनी मुद्रणाचे काम चांगल्याप्रकारे व वेळेत पूर्ण करुन दिले त्यांचाही मी ऋणी आहे.

संपादक,

**प्रा. डॉ. रमेश तुकाराम परिहार**



झेप वार्षिकाकं २०२२

# प्राचार्यांचे मनोगत

झेंप

प्रिय विद्यार्थी,

सत्र २०२१-२०२२ चा झेप अंक प्रकाशित करण्यासाठी संपादक मंडळाचे अभिनंदन !

या महाविद्यालयाचे विद्यार्थी ज्ञान व कौशल्य संपन्न असावेतच, त्याच बरोबर त्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत करावा. पुढील जीवनात येणारे संकटे, समस्या ह्या वेगळ्या प्रकारच्या राहणार आहेत. त्यांना समर्थपणे सामोरे जाण्यासाठी, तसेच एक जबाबदार व सृजनशिल नागरिक बनविण्याचे ध्येय महाविद्यालयाचे आहे. यासाठी विद्यार्थ्याने संवादाचे तंत्रज्ञान, अद्ययावत संगणक प्रणाली, इंटरनेटचे जाळे या सर्वांच्या प्रगतीमुळे ज्ञानाचे व माहितीचे भांडार सर्वांसाठी खुले झाले आहे. संशोधन व समाजपयोगी आव्हानांचा स्विकारणे हे आजच्या विद्यार्थ्याचे आद्य कर्तव्य आहे.

गुणवंत पुर्ण शिक्षणाची कास धरुन प्रगतीची नवनवीन शिखरे पादाक्रांत करताना विद्यार्थ्यामधील क्षमता, सुप्तगुणांना कौशल्यांना वाव मिळावा त्यांचा विकास व्हावा यासाठी आपल्या महाविद्यालयाने झेप हा वार्षिक अंक प्रकाशित करीत आहे.

या वार्षिक अंकामधील प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सहभागी सर्वांचे हार्दीक अभिनंदन..!

प्राचार्य डॉ. बी. बी. वानखडे
विज्ञान महाविद्यालय, मलकापूर

# अनुक्रमणिका


| शिर्षक | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती | |
| २) | मराठी विभाग | |
| ३) | हिंदी विभाग | |
| ४) | उर्दू विभाग | |
| ५) | इंग्रजी विभाग | |
| ६) | महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी | |




झेप वार्षिकाकं २०२२

* विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती *




**Vaishnavi Gajanan Sapkal**
B.Sc. II (CPS)



* विद्यार्थ्यांच्या कुंचल्यातून साकारलेली कलाकृती *



**Neha Dilip Gavatre**
B.Sc. I (PCM)

## पळसखेड येथील सेवा संकल्प प्रतिष्ठानास सदिच्छा भेट...

पियुष निवृत्ती बोरले B.Sc. III (CPS)

कधी कधी आपली नजर वळते आजुबाजुला असलेल्या अशा लोकांकडे किंवा दिसतात असे अनेक चेहरे उकीरड्यावर अन्न शोधतांना, विव्हळतांना किंवा स्वत:ची दु:खे स्वत: सोबतच व्यक्त होतांना पण अशा वेळी काहीही न करता भावना शून्य नजर घेऊन आपण तसेच पुढे निघुन जातो. वाढलेल्या जटा, अंगावरील जखमा घेऊन रस्यावर वनवन फिरणाऱ्या अशा लोकांसाठी आपण कधी काही येत करतो का ?

तर नाही फार फार तर पैसे देऊन पुढे निघुन जातो. पण त्यावेळी आपल्या हे लक्षात नाही की त्या व्यक्तीला पैशांची नाही तर ओंजळभर प्रेमाची गरज आहे. तो अन्नाप्रमाणे प्रेमाचा आणि मायेचाही भुकेला आहे. मन सुन्न करणार हे चित्र बदलण्यासाठीच एक कृती जन्माला आली आणि ती म्हणजे सेवा संकल्प प्रतिष्ठान. प्रतिष्ठान म्हणजे असंख्य अनाथ मनोरुग्ण, निराधार लोकांसाठी एक जगण्याची नवी उमेद घेऊन आली. या सेवा संकल्प प्रतिष्ठानाचे निस्वार्थ पहाता माणुसकीच खरे प्रेम आणि वात्सल्याचे खरे मोल जगाला दाखवून दिलं. या सेवा प्रतिष्ठानाचा महत्वाचा दुवा ज्यांच्यामुळे ही सेवा आज सर्व वंचित घटकांपर्यंत पोहोचू शकली ते म्हणजे डॉक्टर नंदकुमार पालवे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. आरती पालवे. पालवे दाम्पत्य हे गेले कित्येक वर्ष या लोकांसाठी कार्य करत आहेत. डॉ. पालवे यांनी दिवस रात्र या सर्व बेसहारा लोकांची मनोभावे सेवा केली व त्यांना पुन्हा जगण्याचा आधार दिला. आज त्यांच्या सोबत अनेक जन या सेवेत सहभागी झाले आहेत. ज्यांची नावे खालीलप्रमाणे....

१) मा.श्री. रमेशभाऊ उमाळकर
२) मा. डॉ. बी.बी. वानखडे
३) मा. डॉ. वाय. डी. पाटील
४) मा. डॉ. आर. टी. परिहार
५) मा. प्रा.सौ. पी.एम. इंगळे
६) मा. श्री. उमेश शिंदे
७) श्री. अभिजीत इंगळे (पथक प्रमुख (मुले)
८) श्री. पियुष बोरले
९) आशिष पागृत
१०) सुदर्शन क्षिरसागर
११) कु. दर्शना मोगरे (पथकप्रमुख मुली)
१२) कु. स्नेहल भारंबे
१३) कु. विशाखा नारखेडे
१४) कु. गायत्री तळेकर

*****

## संवाद... (Lockdown Effects)

**मोहीनी गोपाल गारमोडे**
B.Sc. II (A) CBZ

आज उठल्या उठल्या मी माझ्या अलमारी जवळ गेली
तेवढ्यात मला अलमारीतुन एक हाक ऐकु आली
मला मारलेली हाक ऐकुन मी पुर्णपणे गोंधळली
अग मी तुझी छत्री तुझी पाणी पावसाची सोबतीन
विसरलीस की काय मला ?
तुझी शाळा बंद काय झाली माझी आठवण ही नाही आली तुला ।।
तु डांबुन ठेवलय मला या अलमारीच्या कोपऱ्यात
बाहेर काढ मला येवु दे कुणाच्या तरी कामात ....
छत्री गप्प बसली आणि दप्तर मला म्हणाले
अगं, बघ जरा माझे हाल कसे बेहाल झाले
हे काळाचे सावट काय आले
तु माझ्याकडे बघितलही नाही
पुस्तकही माझं मला सांगत होत काही ....
तुला रोज नवा धडा शिकवणारा मी
माझ्याकडे एकवेळ बघतरी
कवर फाटलाय माझं, पानं ही साथ सोडून जाताय दुरी
सावर आम्हाला आवर आम्हाला
पुन्हा वेळ आणि जागा दे आम्हाला ।।
त्या सर्वांची मनस्थिती मला कळाली
त्यांनी दिलेली शिकवण ही मला आवडली
शाळा बंद झाली म्हणून मी त्यांना ही बंद केले
आता त्यांच्या सोबत काढलेले आठवले
आता मीही थोडा काळ त्यांच्या आठवणीत असते
आठवणी सोबतच, उद्याचा दिवसही दिसते
आज ना उद्या हा कारावास संपेलच
घरा बाहेर जाण्याचा काळ ही येईलच ।।
उद्या शाळेत जाण्यासाठी, आज घरी राहायचय
आपल्या पुस्तकांना, वस्तुंना मैत्रीनींना महत्त्व द्यायचयं
परमेश्वरा थांबव हा जिवघेणा लपंडाव
हाक एक लेकराची आता तरी शाळा दाव ।।



## लेक वाचवा लेक शिकवा...

**मोहिनी गोपाळ गारमोडे**
B.Sc. II - CBZ

घरी जन्माला येता लेक आनंदाने उजळते घरदार
लक्ष्मीच्या पावलाने होते बापाची जिवनाची भरभराट
वंशाच्या दिव्या पेक्षा दिव्यातली वात बरी
संस्कार आणि संस्कृतीची प्रकाश देते घरीदारी
गरीबीची तमा न बाळगता परिस्थितीशी करते दोन हात
बापाच्या हाताला देते कष्टाचा मदतीचा हात
कुणाची मुलगी कुणाची ताई कुणाची आई
आयुष्याच्या वळणावर निभावते भुमिका सर्वकाही
लेक वाचवा लेक शिकवा नका करु वैचारिक मतभेद
अभिमान बाळगा लेकीचा नका करु वैचारिक मतभेद
शिक्षण उद्योग नोकरीत बरोबरीने चालते प्रवाहात
आवाज घुमतो सगळीकडे अभिमानाचा या महाराष्ट्रात ।।

आज सकाळी धुक्याने छान गोष्ट शिकवली
की जीवनात रस्ता दिसत नसेल तर दुरचं
पाहण्याचा प्रयत्न करण व्यर्थ असतं
एक एक पाऊल टाकत चला रस्ता
आपोआप मोकळा होत जाईल ।।

**संकलन - मोहिनी गोपाळ गारमोडे**
B.Sc. II - CBZ

## बहिणीची माया...

मोहीनी गोपाळ गारमोडे B.Sc.II-CBZ

कस असतं ना बहिणी-बहिणीचं नात
दोघीमध्ये सारं जग सामावुन जात,
छोट्या-छोट्या गोष्टीवरुन भांडण होतं,
थोड्यावेळाने भांडण वगैरे विसरल्या जात,
प्रत्येक गोष्टी करतात शेअर
आणि करतात एकमेकींची केअर ।।
तिच्या प्रत्येक वस्तूवर हक्क जणू आपलाच,
मात्र वस्तू हरवल्यावर खुप मोठा गपलाच
तिच्या लग्नाची गोष्ट निघाली की चिडवायच तिला
लग्न झाल्यावर मात्र मिस करायचं तिला
कधी तरी येणारी पाहुणीन म्हणून येते ती
आणि फक्त सासरची गोष्ट गंमत सांगते ती ।।
कळलेच नाही कधी झालो आम्ही मोठे
एकत्र आलो आम्ही की मोठे ही होतात छोटे
पप्पाच्या रागापासून आईच्या मारापासून
वाचवायची एकमेकांना
आता मात्र जिव झुरतोय पण कोणी दिसेना
काय दिवस होते लहानपणीचे
आता दिवस फक्त आठवणीचे ।।

****

## भरभरुन जगावे...

मोहीनी गोपाळ गारमोडे B.Sc.II-CBZ

मनाला कितीही सांभाळले
तरी आतुन तुटतच असते...
कितीही प्रयत्न केला तरी
काहीतरी सुटतच असते.
कितीही धावतच राहतो
या भौतिक सुखाच्या मागे....
हे खरे जगणे राहून जाते
आणि तुटत असतात धागे...
तुम्हीही जगून आपल्यांना
आता सोबत घेऊन चला
हे आयुष्य जगण्याची
माणसा आहे रे एक कला
आयुष्य असे जगावे
की इतिहास घडायला हवा
या माणसाने माणसाची
व्हायला पाहिजे दवा
तुम्ही विचार ठेवा निर्मळ
माणसाने माणसासम वागावे
आयुष्य फार सुंदर आहे
जिवन भरभरुन जगावे.

***



## पहिला पाऊस...

मोहीनी गोपाळ गारमोडे B.Sc.II-CBZ

पावसाळ्यातला तो पाऊस पहिला
आठवतो आजही मला ।।
गार गार वारा वाहिला
मातीच्या त्या सुगंधाने
नकळत मोहून घेतले मला
पाण्याचा तो प्रत्येक थेंब
जणु स्पर्श करतो मनाला...
पावसाळ्यातला तो पाऊस पहिला
आठवतो आजही मला ।।
काळेकुट्ट झाले आभाळ
इंद्रधनुष्याने तटवले मेघाला
थेंब थेंब पावसाने
ओल चिंब केलं तनुला
नाचले न्हाऊन निघाले
मुलाच्या चेहऱ्यावर पाहिले मी आनंदाला
पावसाळ्यातला तो पाऊस पहिला
आठवतो आजही मला ।।
पावसाने त्या पेरणीची लगबग सुरु झाली
नांगरासह बैलजोडी शेताकडे निघाली
किलबिलाट तो पक्षांचा कोकिळीचा आवाज
थंड अश्या वाऱ्याने घातलीहोती साद
सुंदरता ही लाभली होती त्या वातावरणाला
पावसाळ्यातला तो पाऊस पहिला
आठवतो आजही मला ।।
टवटवीत झाली झाडं जाई-जुई सह मोगराही फुलला
बघता बघता क्षितीजाला सुर्यास्त झाला
त्या दिवशी मी पृथ्वी वरचा हिरवा स्वर्ग
पावसाळ्यातला तो पाऊस पहिला
आठवतो आजही मला ।।

## ओला दुष्काळ...

मोहीनी गोपाळ गारमोडे B.Sc.II-CBZ

धरणी गं धरणी माय धीर धर थोडा
तुझ्या वाचुन जिव जणु पाण्याचा बुडबुडा
उगवलेले सोन करु दे की गोळा
धरणी ग धरणी माय धीर धर थोडा ।।
तु दिला दगा तर सांग कसं जगु
कुणाकड सांग मी आशेन बघु
तुझ्या मुळचं बर आहे मी,
आभाळाकडं पाहे मी
वरुण देवा आता तरी कोप तुम्ही सोडा
धरणी गं धरणी माय धीर धर थोडा ।।
सोयाबीन गेल, मका गेला, ज्वारी बी गेली
कपाशीच्या बोंडा संग पाती फुल नेली
पावसान केली मात
निसर्गान केला घात
मुलांच्या स्वप्नांचा होतोय चोळाबोळा
धरणी गं धरणी माय धीर धर थोडा ।।
आकाश जणु दुःख त्याच कडाडून सांगतोय
प्रदुषणाचा राग तो मानसावर काढतोय
प्रदुषणाचं कारण ही माणुस
मग रुसवुन त्या निसर्गाला काय ती हौस मौस
आपला मानुन निसर्गाला नात तुमी जोडा
धरणी गं धरणी माय धीर धर थोडा ।।
पुरे झाली शिक्षा आता शांत हो देवा रं
कास्तकार तुझ लेकरु घायाळ अती झाल रं
मुलांच्या शिक्षणासह मुलीच लगीन ही आलं
ओल्या दुष्काळाच देवा निवारतु साल
धरणी गं धरणी माय धीर धर थोडा ।।
जगाचा पोशिंदा म्हणतात मला
लाज राख मासी येवो द्या तुला
जिव माझा तुटतोय तोडा तोडा
धरणी गं धरणी माय धीर धर थोडा ।।

## आठवण... !!

तुझी माझी भेट ती पहिली
आठवे मला आजही,
आठवताच ते क्षण
का येतो अश्रुंचा रण ।।
ओल्या त्या मातीला
ओला तो सुगंध,
ओल्या त्या सांझेला
तुझाच गंध ।।
अन माझ वेड मन
भिजत होत तुझ्या आठवणी संग,
तुझी आणि माझी भेट ती
क्षणोक्षणी का आठवतसे ।।
काहितरी होते नवे
आधी कधी ना वाटले,
येताच आठवण तुझी
अश्रुही येतात ।।
अलगद सारे क्षण
मग नजरे समोरुन जातात,
होतास डोळ्यांसमोर तु माझ्या
शब्दच काही सुचेना,
का घडत असे
मला कधीच कळेना ।।
मी मागितला चंद्र
हात पोळलेच आहे,
आयुष्य तेच आहे
आठवण मात्र आठवणच आहे ।।
भानावार येताच
वास्तवाचे चटकेच आहे,
आठवणी राहील्या मागे
समाधान इतकेच आहे ।।

## फौजी...

दिव्या अनंत वराडे B.Sc.II-CPS

एक फौजीच असतो जो देशासाठी
आपले प्राण अर्पण करतो....
एक फौजीच असतो जो तरुण वयात
देशासाठी लढायला जातो....
एक फौजीच असतो तो जो आपल्या आईबाबाला,
मित्राला, बायको, मुलांना सोडून फक्त देशासाठी
लढायला जातो...
एक फौजीच असतो जो देशाला आपले
जीवन अर्पण करतो.....
एक फौजीच असतो जो देशासाठी आपले प्राण
सोडतो.....
एक फौजीच असतो जो अमर होऊन जगतो
एक फौजीच असतो.....





## माणुसकी...

दिव्या अनंत वराडे B.Sc.II-CPS

एकदा माणुसकीने निस्वार्थ पणे वागुन बघा,
कधीतरी निस्वार्थपणे कोणाला मदत करुन बघा,
कधी कोणाला कमी जास्त लेखू नका,
सर्व आपल्या जागी बेस्टच असतात.
कधी कोणाच्या गरीबीवर हसु नका,
ते दाखवत नसले तरी त्रास त्यांना पण खुप होतो
आताच्या काळात ९०% लोक फक्त स्वत:चा विचार
करतात.
कधी दुसऱ्याचा विचार करुन बघा
सर्वांना सोबत निस्वार्थपणे बोलायला शिका
सर्वांना सोबत माणुसकीने वागायला शिका
खरच मनाला खूप आनंद भेटतो हा....

****



## ज्ञानमुर्ती....

मिना संजय भोपळे M.Sc. I

अज्ञानाच्या तिमिरावरती
अखंड जी ज्ञानज्योत जळती
ही ज्ञानमुर्ती आमची
शब्द भान अन ज्ञान ज्यांचे
घडवती जे भविष्य आमचे
अथांग सागरापरी किर्ती ज्यांची
ही ज्ञानमूर्ती आमची
जरी संगती कक्षांपुरती
आयुष्यभर शिदोरी न सरती
पथकांवर मार्गदर्शनही करती
ही ज्ञानमूर्ती आमची
ही ज्ञानमूर्ती आमची

****



## स्वातंत्र्याची लढाई ...

मिना संजय भोपळे
M.Sc. I

शतक अठराशे अन साल होत न्यार
देशामधी भिनल होत स्वातंत्र्याचं वारं ।।
पेटल्या होत्या मशाली अन माणसही पेटली होती
स्वातंत्र्याच्या युध्दामध्ये सारीच झटली होती ।।
भारतीयांचा १८५७ चा ब्रिटीशांविरुध्द पहिला लढा
म्हैसूरचे युध्द, मराठा युध्द, प्लासीची लढाई
कित्येक झाले उठाव अन कित्येक झाल्या चळवळी ।।
'फोडा आणि राज्य करा' ब्रिटीशांचा होता नारा
'लढा किंवा मरा' भारतीयांच्या घोषणा साऱ्या ।।
कारण लढाई अस्तित्वाची अन प्रश्न स्वाभिमानाचा होता
राजगुरु, सुखदेव, भगतसिंग यांनी हिंसेचा तर
गांधींनीं अहिंसेचा पवित्रा हाती घेतला होता ।।
कर्नल, जर्नल, डलहौसी, मॉंटेग्यू परराष्ट्रीय आले
प्रांत, भाषा, पंथ, नात विसरुन भारतीय एक झाले ।।
केसरी आणि मराठातून टिळकांनी लेखनी हाती धरली
स्वातंत्र्याच्या रणांगणात राणी लक्ष्मीबाई उतरली ।।
एकोणाविसाव्या शतकात जगात महायुध्दे झाले
भारत मात्र स्वातंत्र्याच्या वाटेवर आले ।।
आधी भारत छोडो आंदोलन मग झाली फाळणी
स्वातंत्र्य आले पदरात पण जिवित हानी ना टळली ।।
श्रमाचे झाले चीज, बलीदान कामी आले
सन १९४७ - १५ ऑगष्ट भारताला स्वातंत्र्य मिळाले ।।
भारताच्या निष्ठेपुढे सारा जग हादरला
१९५० ला भारत खरोखर प्रजासत्ताक बनला ।।

****



## देश अजूनही स्वातंत्र्याच्या वाटेवर....

मिना संजय भोपळे
M.Sc. I

लोटली वर्ष ७५ परक्यांपासून मुक्तेची
सुरुवात झाली नवीन देशा अंतर्गत युध्देची
जनता १५ वर्ष विकासाच्या आशेवर
देश अजूनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।१।।
प्रश्न दंगलीचे, प्रश्न बेरोजगारीचे
कधी चोरीचे तर कधी लाचारीचे
कधी प्रश्न कोरोनाच्या लाटेवर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।२।।
रोज होतात दौरे विदेशाचे
त्यांनाही आमंत्रणे भारत भेटेचे
का नाही कुणी येत गावाच्याही भेटेवर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।३।।
कर्जाचा होत आहे शेतकऱ्यावर सुडा
सुटता, सुटेना, बाजार भावाचा तीढा
बळीराजाही टांगला जातो तराजुच्या काटेवर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।४।।
डिझेल पेट्रोलात रोज भाववाढ होते
सरकारी टेबलाखालीही भ्रष्टाचार होते
माणूसकीही विकल्या जाते हजारोंच्या नोटेवर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।५।।
अपहरण, बालहत्या, स्त्रियांवर होतो अत्याचार
मात्र मतांची जीत आणि मतांचीच हार
मंत्रीही असतात सत्तेच्या थाटेवर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।६।।
संस्कृती घसरली, रुपयाही घसरला
रिते झाले भांडार, ठेवाही सरला
अर्थव्यवस्थाही घसरत आहे काठावर
देश अजुनही स्वातंत्र्याच्या वाटेवर ।।७।।

# माझं पहिलं प्रेम आहेत ते....

वैष्णवी गजानन सपकाळ
B.Sc. II (CPS)

२००२ मध्ये लग्न त्याचे झाले,
दोन जिवांना बाप्पाने एक केले....
सगळ्यांप्रमाणे लिहिली होती त्यांच्या जोडी,
आज त्याच्यावर लिहिण्याची निर्माण झाली गोडी...!
२००३ मध्ये जन्म माझा झाला,
त्यांनी मला त्यांचा मुलगाच समजला....
बालपणी जेव्हा मी होतो तान्हा,
अमृताहुनि गोड पाजल्यास पान्हा...!
आईबाबा माझे गरीब व भोळे,
त्यांच्या न्यायालयाने माझे सर्व गुन्हे माफ केले,
खूप घाम गाळून रक्ताचे केले पाणी,
बालपणापासून फुलासारखे जपले,
जणु मी एक राणी...!
माझे स्वप्न त्यांचे समजून पूर्ण त्याला केले,
तुम्हीच माझी हिम्मत आणि प्रेरणा राहले....
त्यांचे सारे प्रॉब्लेम साईडला ठेवून चेहरा हॅप्पी आहे,
आई मायेची लाट व बाबा प्रेमाचा सागर आहे...!
माझे सर्व हट्ट, तुम्ही पुर्ण करतात,
बाप्पाला काय मागु सर्व काही तुम्हीच देतात,
बाप्पा माझ्या आईबाबाचं खुप मोठं आयुष्य हो,
या जगात विना आईबाबाचं एकही व्यक्ती न हो...
ते खुप अनमोल जणू कोहीनूर आहे,
स्वामी तिन्ही जगाचा त्यांच्या विना भिकारी आहे...
एका मुलींचे नखरे फक्त तेच उठवू शकतात,
समाज आणि लोक फक्त बोट उचलता....
मला समजून घेणारे, काही चुकलं तर हक्काने
ओरडणारे....
आणि संपूर्ण जग जरी माझ्या विरोधात झाले,
तरी माझ्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे....
या जगात जगण्याचे बळ फक्त तुमच्यामुळे आले.
आईबाबा माझ्या आयुष्यातील महत्त्वाचे स्थान आहे,
कारण ही व्यक्ती आहे म्हणून माझे जगणे आहे...
काय लिहावे तुमच्याबद्दल, मायेला तुमच्या तुलनाच
नाही,
सांगायला माझ्याकडे शब्दच नाही....
लिहिता लिहिता अपुरी पडेल शाई,
लाखात एक फक्त, तुम्हीच माझे बाबा आई...
स्वत: दु:खी राहून मला सुखी ठेवतात,
माझ्या जगण्याला पंख नवे फुटतात....
कितीही त्यांच्याबद्दल लिहा कमीच होते,
जिवनाच्या प्रत्येक वाटेला ते माझे सोबती होते...
माझे खुप प्रेम तुमच्यावर आहे,
धन्यवाद आईबाबा म्हणून संपवते आहे...





# हरवलेली माणुसकी...

दर्शना सदाशिव मोगरे B.Sc. III (CPS)

स्वत:च्या स्वार्थासाठी आजकाल
माणुसकी विकली जात आहे,
आता माणुसकी पेक्षा जास्त तर
पैशांचीच किंमत आहे....
एखाद्याने मदत केली तर....
त्याचे आभार मानायचे सोडून,
हा भरकटलेला माणूस
दगडामध्ये देव शोधत आहे...
आयुष्याच्या वळणावर रोज
नवनवीन माणसांचा अनुभव येत आहे
कुणी माणुसकीत स्वत:ला पाहणारा तर,
कुणी माणूस आहे हेच विसरलेला दिसत आहे
आजकाल माणूसच माणसाचा
खेळ मांडतांना दिसत आहे
माणुसकीच्या या युध्दात माणूस
स्वत:शीच भांडतांना दिसत आहे....
दिवसेंदिवस वाढणारे गुन्हे पाहता हेच
समजत की माणूस माणुसकी विसरत आहे
पहिले संकटाच्या वेळी धावत येणारा माणूस
आजकाल आंधळ्याच सोंग घेत आहे....

*****



# सुखाचे चांदणे...

सुस्मिता संजय इंगळे B.Sc. III (PCM)

मोरपंखी चाहुलींचे सोबतीने चालणे
अंतरावर पसरलेले टिपूर से....
सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे...

कोण या वेड्या मनाला आस लावी भाबडी
कोण आहे ज्यामुळे हे उंबरठ्याला लांघणे
ही नवी सुरुवात आहे की नवे आभास हे
दुरवरची ती निळाई मागते....
सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे...

भोवतीचे सुर हळवे ऐकताना वाटते
गायले मी अंतरीच्या वेदनांचे हुंदके
हरवलेली स्वप्न होती थबकलेली पाऊले
पण तुझ्या भेटीत आता गवसले....
सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे...

मोरपंखी चाहुलींचे सोबतीने चालणे
अंतरावर पसरलेले टिपूर से....
सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे, सुखाचे चांदणे...

*****



## निसर्ग...

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

याड लागलयं ऽऽऽ या लागलाय ऽऽऽ
हे गाण म्हणण्याऐवजी
झाड लावलयं ऽऽऽ झाड लावलय ऽऽऽ
असं म्हणून तसं वागलो तर निसर्गसुध्दा
झिंग झिंग झिंगाट होईल....

## दसरा...

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

अयोग्य रिवाज टाकून
योग्य तेच टिपलं जावं
उत्सव साजरे करतांना
पर्यावरण जपलं जावं

भविष्यात येणारा
आताच टाळावा खतरा
वृक्षारोपण करुन
साजरा करावा दसरा.

## पर्यावरण

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

इकडे मोजले तिकडे मोजले
सगळीकडेच तापलेले आहे.
उन्हाचा चढता पारा पाहून
म्हणे पर्यावरण कोपलेले आहे

मनाला प्रसन्नता देणारी ती
जनु थंडाईच लपली आहे
पण पर्यावरण संवर्धन करणे
ही जबाबदारी आपली आहे.



## पर्यावरण दिन...

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

पर्यावरणाचे आपल्या भोवती असणे गृहित धरुन, गेली काही दशके, त्यातील विविध घटकांची हानी करत आलो आहोत.

परंतु पर्यावरणाचा समतोल ढासळण्याचे परिणाम दैनंदिन जीवनातही जगभर दिसुन लागलने याबाबत जागृती करण्याची गरज उत्पन्न झाली आहे.





## पर्यावरण दिन व सोशल मिडीया

अमर आर. काजळे B.Sc. II (CBZ)

पर्यावरण दिनाच्या शुभेच्छांचा
सोशियल मिडीयातून पूर वाहत आहे,
मात्र शुभेच्छा देता घेतानाही
जबाबदाऱ्यांच जणु धुर आहे.

वाढत्या पर्यावरणीय विध्वंसाची
माणसांनी जान ठेवायला पाहीजे
अन् पर्यावरण दिनाच्या औचित्याने

एक तरी झाड लावायला पाहीजे.

## बालपण...

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

कधी निसर्ग निराळा
ऋतुंचा हा खेळ निराळा
कधी ऊन कधी पाऊस
कधी सोसाट्याचा वारा

गंध मातीचा येऊनी
तृप्त होई माझे मन,
चिंब भिजुनी पावसात
मज आठवे बालपण....

## आयुष्य हे...

अमर आर. काजळे B.Sc. II (CBZ)

आयुष्य हे विधात्याच्या वहीतील एक पान असतं..!
रिकामं तर रिकामं,
लिहिल तर छान असतं....!
शेवटच पान मृत्यु अन्
पहिलं पान जन्म असतं...!
मधली पाने आपणच भरायची,
कारण ते आपलच कर्म असतं...!
होणाऱ्या चुकांना टाळायचं नसतं,
चुक झाली तरी फाडून फेकायचं नसतं,
कारण
त्यातुनच आपल्याला पुढे शिकायचं असतं...!

## विद्या...

अमर रामेश्वर काजळे B.Sc. II (CBZ)

श्लोक –

*न चोरहार्य न च राजहार्य*
*न भ्रातृभाज्यं न च भारकारी ।*
*व्ययेकृतेवर्धते एव नित्यं*
*विद्याधनं सर्व धनं प्रधानम् ।।*

अर्थ –

विद्यारुपी धन सर्व धनात श्रेष्ठ आहे. ते चोरांना चोरता येत नाही. राजाला जप्त करता येत नाही. भावांना त्यात वाटणी मागता येत नाही. त्याचे ओझे होत नाही. जसजस त्याला खर्च कराल तसतसे ते वाढतच जाते.

## विषयांची भेळ

अमर आर. काजळे B.Sc. II (CBZ)

मराठी माझी
English ने येते नशा
History ने तर डोकेच दुखते
Politics घेऊन सगळे फसले
Math सोडविणे म्हणजे Risk
Physics चे उत्तर Fix
Chemistry तर फारच भारी
बसली डोक्यात तरच प्यारी
नाही तर करायला लावते October वारी
Biology तर जीवनाची आजी
तेव्हा बोलवली तेव्हा राजी
काढले तर ठीक
Diagram नाहीतर मागायला लावते भीक
Economics मध्ये पैश्याची व्यथा
मराठी सांगते संतांच्या कथा
English मात्र तोंडची बात
नापास झाल्यावर पडते व्याज
तर वृक्षांची माय
Zoology ते म्हणते Genetics पाय.
असा हा सर्व विषयाचा खेळ
लक्ष दिले तर बसतो मेळ
जर का केलाच खर्च वेळ
तर शिक्षणाची होईल भेळ

****

## बाबा...

वैष्णवी बाबुराव कुयटे B.Sc. III (PCM)

आईने जन्म दिला तर,
त्यांनी जगाशी ओळख करुन दिली
ते म्हणजे बाबा.....
लहानपणी बोट देवून चालायला शिकविले
ते म्हणजे बाबा.....
चालता चालता पडले तरी, पुन्हा उठून चालण्यास
हिम्मत दिली
ते म्हणजे बाबा.....
जेवढे दिसतात बाहेरुन कठोर, तेवढेच आतुन मऊ
ते म्हणजे बाबा.....
कुटूंबासाठी राब राब राबतात दिवसरात्र
ते म्हणजे बाबा.....
कष्ट करतात उन्हातान्हात आणि घरात आणतात
दोन घास
ते म्हणजे बाबा.....
मुलांच्या सुखासाठी, स्वत:चे सुख विसरुन काम
करतात
ते म्हणजे बाबा.....
बाबा सारखे नाही या जगात दुसरे
बाबा आहे तर संपुर्ण जगच आपले....

****





## वाट...

ऋतुजा अनिरुध्द देशपांडे B.Sc. I (CBZ)

वाट वाकडी तिकडी
घाट माथ्यावर गेली
वाट वाकडी तिकडी
रानावनांतून गेली ।।

रानावनात राघुची
शीळ जोरात घुमली
मैनेचीही साद त्याला
काही क्षणात मिळाली ।।

क्षण टिपतां टिपतां
नाही उसंत मिळाली
चालतच राहीलो मी
वाट चालली चालली ।।

वाटेवर फुलांचीही
जशी चादर अंथरली
वाट काट्यांची तरीही
जणू सुखाची वाटली ।।

सुखाच्या ह्या जाणिवेने
पानगळ मनाची थांबली
वसंताच्या आगमनाची
चाहूल रानात लागली ।।

रान संपता संपेना
वाट संपता संपेना
वाट वाकडी तिकडी
वाट अंतहिन झाली ।।

****

## पूर्वीसारखे दिवस...

ऋतुजा अनिरुध्द देशपांडे B.Sc. I (CBZ)

पूर्वीसारखे दिवस पुन्हा
फिरुन कधी येतील का ?
चहूकडेची अशी फसवणूक
कधीतरी थांबेल का ?
व्यवहारातील तशी सचोटी
पुन्हा कधी दिसेल का ?
आपुलकी अन् प्रेम जिव्हाळा
शोधून तरी सापडेल का ?
सत्याची चाड कुणाच्या
मनी कधी जागेल का?
लाचखोरीचा कर्करोग हा
समुळ नष्ट होईल का?
त्या दिवसांतील आत्मीयता
कुणां कधी उमगेल का ?
पूर्वीसारखे दिवस पुन्हा
फिरुन कधी येतील का ?

***



## आयुष्य भरभरुन जगायचं असतं

मेघा वि. येवले M.Sc. II

उंच आभाळात बघावं एकटक;
त्याच्या शुभ्रतेत रमायचं असतं,
बेधुंद पक्षांप्रमाणे स्वच्छंद निसर्गाचा
आनंद लुटायचं असतं....
निळे पांढरे रंग अनेक
त्यात फुलाचं सौंदर्य शोधायचं असतं,
अशाच या रंगीबेरंगी दुनियेतला
प्रत्येक रंग जगायचं असतं....
ऊन-सावली प्रमाणे असतं सुख दु:ख
याला निर्भिडपणे सामोरं जायचं असतं,
चांगल्या वाईट प्रत्येक व्यक्तीकडून
जिवनात काहीतरी शिकायचं असतं.....
व्हावं कधी कठोर तर कधी हळवं होऊन
आपल्याच मन जपायचं असतं...
माझं तुझं न कर आपलच समजून,
आपुलकीचं प्रेमळ नातं विणायचं असतं,
जिथलं तिथं द्यावं सोडून
थोड्याशा अडचणीनं कधी निराश व्हायचं नसतं...
कोण दिवस कसा येईल सांगता येत नाही
म्हणून प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यायचं असतं,
कधी मनात ठेवाव, तर कधी मनमोकळं बोलून
मोकळं व्हायचं असतं....
आयुष्यातला प्रत्येक क्षण भरभरुन
जगायचं असतं...

*****

## आयुष्याला द्यावे उत्तर...

ऐश्वर्या कैलास गोरे B.Sc. III (CPS)

असे जगावे दुनियेमध्ये, आव्हानाचे लावुन अत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...
नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची...
असे दांडगी इच्छा ज्याची, मार्ग तयाला मिळती सत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...
पाय असावे जमिनीवरती, कवेत अंबर घेताना,
हसू असावे ओठांवरती, काळीज काढुन देतांना...
संकटासही ठणकावुन सांगावे, आता ये बहेत्तर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...
करुन जावे असेही काही, दुनियेतुनी या जाताना,
गहीवर यावा जगास साऱ्या, निरोप शेवटचा देतांना...
स्वर कठोर त्या काळाचाही,
क्षणभर व्हावा कातर-कातर,
नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्याला द्यावे उत्तर...

मुळ कवी - गुरु ठाकुर

*****



## आई ! मला जन्म घेऊ दे !

ऐश्वर्या कैलास गोरे B.Sc. III (CPS)

तु जसे पाहिले जग मला देखील पाहू दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे ।।धृ।।
परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहे कसे तुला कळत नाही
ताईसवे माझ्या मला जन्म हा घेऊ दे
नको मारु आई मला आनंदाने न्हाऊ दे
हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो कां ?
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो कां ?
राखीसाठी दादाच्या निदान मला येऊ दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे
तू बहिण तू कन्या तु एक स्त्री आहे
काल जिथे तु होती आज तिथे मी आहे
तू जसे विणले नाते तसे मला विणू दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे
पहा मग फिरुन मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्यादानाचे आई तुला देणार नाही
डोळे येता भरुन तुझे पदर मला होऊ दे
नको मारु आई मला जन्म हा घेऊ दे ।।

****

## संयम...

पियुष निवृत्ती बोरले B.Sc. III (CPS)

तणावपूर्ण असलेल्या या जगात लोकांना त्यांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत.
त्यांच्याजवळ कशाकडेही लक्ष देण्यास वेळ नाही
ते बोलण्यापूर्वी आणि शिकण्यापूर्वी कसलाही विचार करत नाहीत.
लोकांना त्यांचे काम द्रुतगतीने पूर्ण करायचे आहे
त्यासाठी ते जे शक्य असेल ते करतात.
इतर लोकांना काय वाटते याची त्यांना पर्वा नाही
त्यांना फक्त त्वरीत यश हवे आहे.
पूर्वी सयंम हा राजा होता.
त्याने एक उत्तम बंधन निर्माण केले
कोणाचेही शोषण केले नाही कोणालाही फसवले नाही
त्याच्या राज्यात प्रत्येकजण प्रेमळ आणि काळजी घेणारा होता.
आता धीर हा इतिहास झाला आहे
धैर्य शोधणे हे एक रहस्य आहे.
पूर्वी स्वतंत्र हे एक रहस्य आहे.
पूर्वी स्वतंत्र असलेले लोक आता घाईत आहेत,
काम जलद करण्यावर त्यांचे सर्वस्व अवलंबून आहे.
अधीरतेमुळे निराशेची पातळी वाढली आहे
आणि बऱ्याच लोकांना नैराश्य आलं आहे.
समाधानी राहण्यासाठी धीर कसा धरावा हे त्यांना माहित नाही
आणि या प्रकियेत बरेच बंध तुटले आहेत.
धैर्य हा आपला खजिना आहे.
ही नैतिक मूल्याचे निर्देशक खूण आहे.
तणावापासून दूर राहण्याचा हा एकमेव मार्ग आहे.
हा सर्वोत्तम प्रतिबंधक उपाय आहे.

## आई...

श्रेया नाफडे B.Sc.II

आई म्हणजे चालता बोलता Satellite
प्रत्येक समस्येला तु सहन करणारा Signt
राब राब राबते अगदी Day Night
म्हणून आमच्या आयुष्यात Light
आई, तु म्हणजे Rest House कॉम्प्युटरचा Mouse
खरचं तुझ्याशिवाय आई
चालु शकत नाही कोणतेही House
आई म्हणजे संगीतातील सितार
आकाशातील Star
तुझ्या असल्याने आई घरही बनते
अगदी Five Star

****

## बहिण-भावाचे नाते...

श्रेया नाफडे B.Sc.II

बहिण भावाचे नाते हे सोनेरी साज असते
प्रेमाच्या राशीवरचे चक्रवाढ व्याज असते
बहिण भावाचे नाते हे सावली देणारा वड असते
आंबट-गोड द्राक्षाचा लुसलुशीत घड असते.
बहिण भावाचे नाते हे काहीसे खट्याळ असते
मनोअंगणी दुडदुडणारे इवलेसे बाळ असते
माझ्या आधी तुला अन् तुझ्या नंतर मला असते
बहिण भावाचे नाते हे श्रावणातला झुला असते
बहिण भावाचे नाते हे काहीसे अबोल असते
शब्दात व्यक्त होणे शक्य नाही ते सागराहूनही
खोल असते
बहिण भावाचे नाते हे थोडे हट्टी असते
एका क्षणाला कट्टी तर दुसऱ्या क्षणाला गट्टी असते

## कोरोना...

वर्षा दिनकर गव्हाळे
B.Sc. I (CPS)

कोरोना आता पाहुणा म्हणून,
वाटले होते जाईल महिनाभर राहून,
पण अंदाज सगळा चुकतच गेला
मुक्काम त्याचा वाढतच गेला
हे काही बरे नाही झाले...

बाजारपेठ बंद झाली
वाहतुक बंद झाली
इथपर्यंत ठीक होतं रे
पण शाळाही बंद झाली,
हे काही बरे नाही झाले.

घरी बसून कामं केले
तरी कुठे वेतन कापले
तर कुठे भत्ते कापले
इथपर्यंत ठीक होते रे
पण कुठे तर कामावरुनच काढुन टाकले
हे काही बरे नाही झाले.

तोंडावर मास्क आले,
हातावर सॅनिटायझर आले
एकमेकांत अंतर वाढत गेले
इथपर्यंत ठीक होते रे
पण शेवटचे चार खांदेकरीही
परके झाले.
हे काही बरे नाही झाले...

****

# अख्या जगात थैमान माजविणाऱ्या कोरोना (कोविड-१९)

प्रज्ञा अनिल खर्चे
B.Sc. III (A)

चीन मधून सुरुवात झालेला आणि नंतर संपूर्ण जगभर पसरलेला कोरोना व्हायरस म्हणजेच कोविड-१९. हा एक संसर्गजन्य आजार आहे. या कोरोना विषाणूचा संसर्ग सर्वप्रथम डिसेंबर २०१९ मध्ये चीन मधल्या वुहान या शहरात आढळून आला होता. या आजाराचा संसर्ग एक संक्रमित व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तिकडे लवकर होत असतो. जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच WHO या संघटनेने कोरोना व्हायरस मुळे होणाऱ्या या रोगाच्या प्रादुर्भावाला जागतिक महामारी घोषित केले आहे. या रोगाच्या संसर्ग झाल्यानंतर काही दिवसांनी याची लक्षणे दिसू लागतात. कोरोना व्हायरस मुळे होणाऱ्या या रोगाच्या प्रादुर्भावाला जागतिक महामारी म्हणून घोषित केले आहे. या रोगाचा संसर्ग कोरोना व्हायरसचा संसर्ग झाल्यानंतर व्यक्तीला सर्दी, ताप येणे, श्वास घेण्यास अडथळा येणे तसेच घशात खवखव होणे अशी लक्षणे जाणवू लागतात.

कोरोनाची जी दुसरी लाट आली आहे त्यातील संसर्गाची लक्षणे ही आधीच्या कोरोना लक्षणांपेक्षा अधिक वेगळी आहेत. जसे की पोटात दुखणे, थकवा जाणविणारे, अतिसार, सतत डोके दुखणे तसेच उलट्या किंवा मळमळ होणे अशी काही लक्षणे कोरोनाच्या नवीन स्ट्रेनमध्ये आढळून येतात. कोरोना व्हायरस हा वेगवेगळ्या लोकांवर त्यांच्यातील रोग प्रतिकारशक्ती प्रमाणे वेगवेगळे परिणाम दाखवत असतो. गंभीर स्वरुपाच्या कोरोना संसर्गामुळे किडनी निकामी होण्याचा धोका संभवतो. यामुळे जीव सुध्दा जाऊ शकतो. आधीपासून आजारी असणारे लोक तसेच मधुमेहाने ग्रस्त असणाऱ्या आणि कमकुवत रोगप्रतिकारशक्ती असणाऱ्या लोकांना या कोरोनाचा अधिक धोका असतो. कोरोना व्हायरस संक्रमणापासून वाचण्यासाठी आपणाला अनेक प्रकारे काळजी घेता येते. त्यामध्ये आपण सार्वजनिक किंवा गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे म्हणजेच सोशल डिस्टंसिंग. डिसेंबर २०१९ च्या पहिल्या आठवड्यात नवीन कोरोना विषाणू सापडला. त्याला कोरोनाचा नवा विषाणूंचा प्रकार घोषित केला आहे. विषाणूची निश्चिती झाली असून सध्याच्या विषाणू हा कोरोनाचा ७ वा प्रकार आहे.

हा विषाणू एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तित संक्रमित होत असल्याने त्याचा धोका अधिक वाढला आहे. हे विषाणू सर्दीच्या विषाणूसारखेच विषाणूंरखेच पसरतात. हे मानव आणि प्राणी दोघांना संक्रमित करतात. हे लवकर प्रसार पावतात त्यामुळे लहान मुलांमध्ये या विषाणूंचे संसर्ग लवकर होते.



**कोरोना विषाणूच्या संसर्गाची मुख्य लक्षणे :**

डोकेदुखी, वाहणारे नाक, खोकला असणे, घसा खवखवणे, ताप येणे, अस्वस्थता, शिंका येणे, दम्याचा त्रास वाढणे, थकवा येणे.

कोरोना व्हायरस विरुध्द लढण्यासाठी दिवस रात्र पोलिस, सैनिक, डॉक्टर, नर्स, सफाई कर्मचारी प्रयत्न करत आहेत. सुरुवातीच्या काळात भारत सरकारने संपूर्ण लॉकडाऊन जाहीर केला. सर्वजण आपापल्या घरामध्ये सुरक्षित रहावे हाच त्यामागचा उद्देश होता.

सर्व डॉक्टर, नर्स हॉस्पिटलमध्ये कोरोना रुग्णांची सेवा करत आहेत. आरोग्य कर्मचारी सर्व कोरोना बाधित रुग्णांना योग्य औषधोपचार व सुविधा उपलब्ध करुन देत होते. पोलिस सर्व लोकांना आपापल्या घरी सुरक्षित राहण्यासाठी वेळोवेळी सुचना करत हाते. खरोखरच आपल्याला या रोगाला संपवायचे असेल तर आपण सरकारच्या नियमांचे पालन करणे गरजेचे आहे.

कोरोना हा एक विषाणू आहे तो वेगाने वाढतो. कोरोना व्हायरस हा संसर्गजन्य असल्यामुळे याचा प्रसार वेगाने होतो. एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिकडे वेगाने पसरतो. ज्या प्रकारे कोरोना व्हायरसचा वेगाने फैलाव होत आहे. त्यावरुन असे दिसते की या विषाणुचे दोन प्रकार आहेत.

१) कोरोना बाधित रुग्णांच्या खोकल्यातून म्हणजेच रुग्ण खोकल्यावर हवेत तुषार उडतात व पसरवतात. त्यात विषाणू असतात. ते आजुबाजुच्या व्यक्तींनी श्वास घेतल्यानंतर त्याचा त्यांना संसर्ग होतो.

२) रुग्ण खोकल्यावर काही तुषार विषाणू आजुबाजुच्या वस्तूवर पडतात. त्या वस्तूंना स्पर्श केल्यानंतर ते विषाणू आपल्या हाताला लागतात. तो हात आपल्या चेहऱ्यावर किंवा नाकावर लागल्यास श्वसन संस्थेतून आपल्या शरीरात जातात व त्याचा संसर्ग होतो.

कोरोना व्हायरसने संपूर्ण जगाला खूप हानी पोहोचवली आहे. पण या व्हायरसमुळे काही चांगल्या गोष्टी पण झाल्या आहेत. संपूर्ण जगात लॉकडाऊन झाल्याने तब्बल ७० वर्षाने जगातील हवा शुध्द झाली आहे. जागतिक तापमानात घट झाली आहे. एका अर्थाने सर्व प्रदूषण कमी झाले आहे.

नोकरीसाठी, व्यवसायासाठी घराबाहेर पडून मुंबई पुणे यासारख्या शहरांमध्ये मुले कामासाठी बाहेर निघून गेलेली आहे. त्या मुलांना आपल्या आई वडिलांना भेटायला सुध्दा वेळ नव्हता पण या कोरोनामुळे हीच मुले आपल्या कुटुंबाला आई वडिलांना वेळ देऊ शकली.

******

## महिला दिन...निमित्त मात्र...

कु. मेघा विनोद येवले
Roll No. 26

नुकताच काही दिवसांपूर्वी महिला दिन झालाय. आता तुम्ही म्हणाल जसे इतर अनेक दिवस असतात तसाच, त्यापैकीच एक महिला दिन...!

पण प्रत्येक दिवस साजरा करण्यामागचं काहीतरी मर्म हे असतचं....

या दिवशी अनेक माध्यमातून महिलांवर शुभेच्छांचा जणू वर्षाव होतो. एवढचं काय तर ऐरवी महिलांना त्यांच्या राहण्या बोलण्यावरुन जज करणाऱ्या सो कॉल्ड पुरुषांनीही या दिवशी वरचेवर का होईना महिलांच कौतुक केलयं...

१९९३ पासून ८ मार्च हा महिला दिन म्हणून साजरा करण्यात येत आहे. मागील काही वर्षांपूर्वी झालेल्या एका संशोधनात एक बाब समोर आल्याच समजतयं त्यानुसार स्त्री पुरुष असमानता संपवण्यासाठी अजुन १०० वर्ष लागण्याची शक्यता वर्तविली आहे. हे कितपत खरे ठरेल याचा मला मात्र अंदाज नाही असो....

वंशपरांपरागत आपली भारतीय संस्कृती...पुरुष प्रधान संस्कृती महिला प्रधान असं कधी ऐकलयं का हो ??

असं म्हणाव अस मी म्हणत नाही मात्र दोघांमध्ये समानता आणण्याचा प्रयत्न आपण करु शकतो. प्रत्येक गोष्टीसाठी फक्त पुरुषच कारणीभूत असता असं नाही.

एकीकडे समाजकारणापासून ते राजकारणापर्यंत महिलांनी देशाच नाव गौरविलय तर दुसरीकडे काही दुष्ट प्रवृत्तीच्या लोकामुळे आजही बऱ्याच स्त्रियांना चुल आणि मुल इथपर्यंतच मर्यादित ठेवलं जात आहे.

बेटी बचाओ, स्त्री सशक्तीकरण असे अनेक कार्यक्रम देशभर चालवले जात आहे. परंतु तरीही त्यांच्या सुरक्षेची खात्री पटलीय का ?

मुळात तिला अजुनही अबला म्हणूनच पुकारलं जातयं यातून ती कमजोर आहे हेच सिध्द होतयं नाही का ?

